MHYA1000-0288-2022

दाखल तारीख :— १७/०२/२०२२
नोंदणी तारीख :— १७/०२/२०२२
निकाल तारीख :— **२७/०३/२०२६**
**कालावधीः—०४वर्ष०१ महिने १०दिवस**

**२ रे. सह न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, केळापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी शेख एस.एन.ए.एस)**

**संक्षिप्त फौजदारी ख.क्र. २००/२०२२** **निशानी क्र.२२**

**अभियोगपक्ष** :— महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पांढरकवडा, ता.केळापूर
जिल्हा यवतमाळ.

**—वि—**

**आरोपी** :— **गजेश्वर तुळशिराम दडांजे**
वय ३० वर्ष, व्यवसाय — मजुरी,
राहणार. मिरा, ता. केळापुर जि. यवतमाळ

**दोषारोप :— कलम २९४, ३२३,५०६, भारतीय दंड विधान**

**श्री. एस. बी. जगताप, अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता**
**श्रीमती. एस. पी. जयस्वाल, आरोपींतर्फे वकील**

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of Offence) | १०/०१/२०२२ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | १०/०१/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of charge-sheet) | १७/०२/२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोप / प्रतीकथन नोंदविल्याचा दिनांक (Date of framing of Charge) | १९/११/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक ;Date of Commencement of evidence) | १८/०३/२०२४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक (Date on which judgment is reserved) | २५/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the judgment) | **२७/०३/२०२६** |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of the sentencing Order, if any.) | ........... |

| अ. क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नांव (Name of Accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of Arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of Release on Bail) | कलम (Offences charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असलयाची तारीख कलम ४२८ प्रमाणे Period of Detention Undergone during Trial for purpose of Section 428 Cr.P.C.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **गजेश्वर तुळशिराम दडांजे** | --- | **०६/०४/२०२२** | २९४,३२३,५०६, भा.द.वी. | निर्दोष मुक्तता | --- | --- |

## <u>न्याय निर्णय</u>
## <u>( दिनांक २७ मार्च २०२६ रोजी घोषीत)</u>

**१.** आरोपी विरूध्द कलम २९४, ३२३ व ५०६ भारतीय दंड विधान अंतर्गत शिक्षापात्र गुन्हयाकरीता सदरचे प्रकरण चालविण्यात आले.

२. **<u>अभियोग पक्षाची घटना अशी आहे की</u> :—**

फिर्यादी हे दि. १०/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०५.३० वाजताचे दरम्यान मौजे. मिरा जिरा ता. केळापुर जि. यवतमाळ घरी

असतांना त्यावेळेस त्यांची पत्नी घरासमोरील अंगणामध्ये झाडझुड करीत होती त्यावेळेस ते शेतातुन घरी आले असता त्यांचे पत्नीचा व आरोपीचा वाद सुरु होता त्यावेळेस त्यांनी त्यांचे पत्नीला व आरोपीला वाद करु नका असे सांगितले तसेच फिर्यादीने आरोपीचे घरातील सांडपाणी अंगणामध्ये येवु नये म्हणुन गोटा लावला तो गोटा आरोपीने काढुन टाकला तो गोटा आरोपीस काढु नका म्हणुन फिर्यादीने आरोपीस सांगितले असता फिर्यादीस आरोपीने मारहाण केली व फिर्यादीस उचलुन फेकुन दिले तेव्हा शेजारच्या लोकांनी फिर्यादीस आरोपीच्या तावडीतुन सोडविले त्यानंतर फिर्यादी घरी निघुन गेले परंतु आरोपी त्यांचे अंगावर धावुन गेले व परत फिर्यादीस रोडवर उचलुन फेकुन दिले तसेच मौजे. मिरा जिरा ता. केळापुर जि. यवतमाळ येथे फिर्यादीचे घरासमोरील रोडवर सार्वजनिक ठिकाणी आरोपी ने फिर्यादीचे पत्नीला “ तु जास्त शहाणपणा करु नको, साली मादरचोद भोसडीची ” अश्या अश्लील भाषेमध्ये शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली व धाकदपटशा केली करीता फिर्यादीने फिर्याद पो. स्टे. पांढरकवडा येथे दिली.

**३.** सदर फिर्यादीवरून, आरोपी विरूध्द २९४, ३२३ व ५०६ भारतीय दंड विधान या गुन्हयाचा तपास पोलिस हवालदार ब.नं. १७९१ प्रेमदास देवराव फुलके यांच्याकडे देण्यात आला. त्या अनुषंगाने त्यांनी घ टनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयान नोंदविले व तपासा अंती आरोपीं विरूध्द वरील नमुद कलमां खाली दोषारोप पत्र प्रविष्ठ केले. आरोपी विरूध्द दोषारोप निश्चित करण्यात आले व त्यांना ते वाचुन दाखविण्यात आले. आरोपीने सदर दोषारोप नाकबूल करून प्रकरणाची संपरिक्षा करण्याची याचना केली.

**४.** अभियोग पक्षाच्या हकिगतीवरून, पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित

झाले. त्याअनुशंगाने मी कारण मिमासेंच्या आधारे खालील निष्कर्ष दिले आहे.

| अ.क्र. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, १०/०१/२०२२ रोजी रात्री ०५.३० वाजताचे दरम्यान मौजे. मिरा जिरा पांढरकवडा येथे आरोपींनी सार्वजनिक ठिकाणी फिर्यादीला व त्याचे पत्नीला अश्लिल शिवीगाळ केली ? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की,उक्त नमुद रोजी, वेळी व ठिकाणी फिर्यादीचे पत्नीला लाथा बुक्क्यानी मारहाण करुन जख्मी केले ? | नकारार्थी |
| ३. | नमुद तारीख,वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिली ? | नकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिंमासा

५. अभियोगपक्षाने आरोपी विरूध्द दिनांक १०/०१/२०२२ रोजीची कथीत घटना कलम २९४, ३२३ व ५०६ भारतीय दंड विधान अंतर्गत साबीत करण्याकरिता साक्षीदार क्र. १ नामे राजु नानु आडे , फिर्यादी (निशाणी १२), यांना तपासले. व तसेच साक्षीदार क्र. २ सुरेखा राजु आडे नि. क्र. २० नुसार यांना तपासले. निशाणी क्र. १ वरील आदेशाप्रमाणे आरोपी यांच्या विरूध्दचे कलम ३१३ फौ.प्र.सं. नुसारचे बयाण नि. क्र. २१ वर नोंदविण्यात आले.

**मुददा क्रं. १ व २ :—**

६. आरोपींचे विद्वान वकिल श्रीमती. एस. पी. जयस्वाल यांनी आरोपीं विरूध्द काहीही आलेले नाही असा युक्तीवाद केला.

७. साक्षीदार क्र. १. यांनी आपल्या साक्षेत असे सांगितले की, घटना ही दि. १०.०१.२०२२ रोजी सायं. ०५.०० ते ०५.३० रोजीची असुन त्या दिवशी त्यांची पत्नी घरासमोरील अंगणामध्ये झाडझुड करीत होती त्यावेळेस ते शेतातुन घरी आले असता त्यांचे पत्नीचा व आरोपीचा वाद सुरु होता.त्या वरुन त्यांनी आरोपी व त्यांचे पत्नीला समजावुन सांगितले की एकमेकांशी वाद करु नका व आरोपीचे घरातील सांडपाणी येवु नये म्हणुन गोटा लावला होता तो गोटा आरोपीने काढल्याने त्यांचे घरातील सांडपाणी फिर्यादीचे घ रातील अंगणामध्ये येत होते त्यांनी आरोपीला सदरचा गोटा काढु नका म्हणुन सांगितले असता आरोपीने त्यावेळेस त्यांना हाताने मारहाण केली तसेच त्यांना उचलुन फेकुन दिले त्यावेळेस त्यांचे आजुबाजुचे एक दोन शेजारी यांनी त्यांना आरोपीचे तावडीतुन सोडविले त्यानंतर ते घरी निघुन गेले त्यानंतर सुध्दा आरोपी हा त्यांचे अंगावर धावुन आला व परत फिर्यादीला रोडवर उचलुन फेकुन दिले त्यानंतर ते पो. स्टे. पांढरकवडा येथे रिपोर्ट देण्याकरीता आले व त्यांनी आरोपीविरुध्द घटनेचा रिपोर्ट दिला.

८. साक्षीदार क्र. ०१ हयाचा उलटतपास आरोपीतर्फे वकीलांनी संपुर्णपणे घेतलेला आहे सदर उलटतपास वाचल्यानंतर असे लक्षात येते की साक्षीदार क्र. १ हयाने त्याचे सरतपसामधील मजकुर पोलिसांना सांगितलेला होता किंवा कसे याचा पुरावा अभिलेखावर दिसुन येत नाही साक्षीदार क्र. १ हयाने त्याचे सरतपासामधील सर्व मजकुर पोलिसांनी त्याचे रिपोर्टमध्ये नमुद केला नाही याचे कारण काहीही सांगितलेले नाही रिपोर्टची तपासणी केली असता असे निदर्शनास येते की सदर साक्षीदार याने सरतपासामध्ये सांगितलेला मजकुर रिपोर्टमध्ये दिसुन येत नाही त्यावरुन असे दिसुन येते की सदर साक्षीदार साक्षेवर अवलंबुन राहु शकत नाही. सदर साक्षीदाराचे साक्ष वर आरोपीने कसुर केलेला आहे असे दिसुन येत नाही.

९. साक्षीदार क्र. २ यांचे साक्षीत असे आले आहे की आरोपी त्यांच्या गावातील असल्याने ते त्यांना ओळखतात घटना ही फिर्यादीचे अंगणामध्ये घरी मौजे. मिरा जिरा ता. केळापुर येथे घडली. आरोपीसोबत फिर्यादी यांचे तोंडी वाद झाले होते, म्हणुन रागाच्या भरात त्यांनी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली होती. पुढे त्याने त्यांच्या सरतपासातुन तोंडी फिर्याद वरील सही वगळता इतर कुठलाही मजकुर त्यांनी सिध्द केलेला नाही. त्यामुळे कोणतेही दस्तऐवज पुरावा कायदयानुसार सिध्द झाले असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे अभियोग पक्षाने सदर साक्षिदार यांचे घ ेतलेल्या कलम १५४ पुराव्याच्या कायदयाच्या उलट तपासामध्येही आरोपीं विरूध्द काहीही आलेले नाही. सदर साक्षिदाराने असे कबुल केले की, त्यांचे आरोपींसोबत आपसी समझोता झाला आहे तशी पुरसिस नि. क्र. १९ नुसार अभिलेखावर फिर्यादी व आरोपी यांनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्यामुळे आरोपी विरूध्द कलम २९४, ३२३ व ५०६ मधील नमुद घटक फिर्यादीच्या मौखिक साक्षीतुन किंवा कोणत्याही दस्तऐवजाविना सिध्द होत नाही.

१०. तसेच घटनास्थळ पंचनामा सिध्द झाला नसल्याने संबंधीत घटनेशी फिर्यादीने दिलेल्या अपु—या पुराव्यामुळे स्थापीत होत नाही. करीता आरोपीस सदर साक्षीच्या अनुषंगाने दोषी ठरविणे योग्य होणार नाही. करीता वरील विवेचनावरून मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी देते.

**<u>मुददा क्रं. ३</u>** :—

११. मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी दिल्याने व आरोपीचा घटनेशी संबंध स्थापीत न झाल्याने मी पुढील आदेश पारित करीत आहे.

# आदेश

**१)** **आरोपी. गजेश्वर तुळशिराम दडांजे रा. मिरा जिरा ता. केळापुर जि. यवतमाळ** यांना कलम २५५(१) फौजदारी प्रक्रिया संहीता अंतर्गत कलम २९४, ३२३ व ५०६ भारतीय दंड विधान अनुसार शिक्षापात्र दोषारोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२)** आरोपींचे जामिन कदबे रदद करण्यात येतात.

**३)** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७—अ ची पुर्तता करण्याकरीता आरोपींनी रक्कम रू.१५,०००/— प्रत्येकी चा नवीन जामीन या न्यायालयात दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत)**

Sd/-
**(शेख एस.एन.ए.एस)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
**केळापुर — कोर्ट नं. २**

**दिनांक: २७.०३.२०२६**